# कुलगुरुपदासाठी अर्ज पाठवण्याचा आज अंतिम दिवस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ संपल्याने त्यांच्या रिक्त जागेसाठी गेल्या महिन्यापासून कुलगुरुपदासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. लॉकडाऊनमुळे अर्जाची प्रिंट पोस्टाने पाठविण्यास १० जुलैपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे आज अर्ज पाठवण्याचा शेवटचा दिवस आहे. शिवाजी विद्यापीठ कॅम्पसमधील १४ उमेदवार आणि इतर विद्यापीठासह जवळपास ३० उमेदवारांनी कुलगुरूपदासाठी अर्ज भरले आहेत. कुलगुरू पदाच्या शर्यतीमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, औरंगाबाद, मुंबई, नवी दिल्ली येथील जेएनयू विद्यापीठातील दिग्गजांची नावे पुढे येत आहेत. असे असले तरी विद्यापीठ कॅम्पसवरील कुलसचिवांसह तब्बल १४ उमेदवारांनी अर्ज भरल्याने शिक्षण वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे.

पुढारी

# प्रथम, द्वितीय वर्ष निकालाबाबत चर्चा

## शिवाजी विद्यापीठातून...

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

प्रथम, द्वितीय वर्षाच्या निकालाबाबत येणाऱ्या अडचणी व त्यासंदर्भातील नियोजन करण्याबाबत ऑनलाईन बैठकीत चर्चा झाली. शासन व अधिकार मंडळाच्या निर्णयानंतर पुढील कार्यवाहीचा निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठ परीक्षा व प्रथम, द्वितीय वर्ष निकालाच्या अनुषंगाने कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठ नियुक्त समितीची गुरुवारी ऑनलाईन बैठक झाली. यात प्रात्यक्षिक परीक्षा व प्रथम, द्वितीय वर्ष निकालाबाबत समिती सदस्यांनी मते मांडली. बैठकीत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे, निमंत्रित सदस्य डॉ. डी. टी. शिर्के, समितीचे अध्यक्ष डॉ. डी. जी. कणसे यांच्यासह पदाधिकारी सहभागी झाले होते.

Kolhapur Edition
10 July, 2020 Page No. 5
Powered by : erelego.com